# नियामक मंडळाची ३३ वी बैठक दिनांक १० मार्च २००३

मा. ना. अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ३३ वी बैठक दि.१०.३.२००३ रोजी पाटबंधारे सभागृह, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र.३३/१

''ठराव करण्यात येतो की, ३२ व्या बैठकीमध्ये पारित केलेले सर्व ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्रमांक ३३/२

"ठराव करण्यात येतो की, सिंचनासाठी वापरात नसलेल्या आणि पुणे महानगरपालिकेला अंशतः भाडेपट्टयाने दिलेल्या मुठा डावा कालवा किमी क्र.८ ते २७ मधील व महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे मालकीचे असलेले ९३ एकर २७ गुंठे (मोजणीनंतर अंतिम होईल ते) इतके क्षेत्र पुणे महानगरपालिकेस खालील अटींवर कायमस्वरुपी हस्तांतरित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

१. हस्तांतरित करण्यात यावयाच्या क्षेत्राइतक्या हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) पुणे महानगरपालिका, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ किंवा त्यांनी निर्देशित/प्राधिकृत केलेल्या व्यक्ती/संस्था यांना उपलब्ध करुन देईल.

२. हस्तांतरणीय विकास हक्क देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही, शासनाची परवानगी इ. बाबींची पूर्तता करण्याची जबाबदारी पुणे महानगरपालिका यांची राहील.

३. वरीलप्रकारे उपलब्ध झालेले हस्तांतरणीय विकास हक्क, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळामधील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी, जाहीर निविदा मागवून विकण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

४. याविषयी निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या मान्यतेने कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना राहतील."

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

ठराव क्र.३३/३

"ठराव करण्यात येतो की,

१. लघु पाटबंधारे तलाव बोरपाडळे ता. पन्हाळा,जि. कोल्हापूर व लघु पाटबंधारे तलाव बोरिवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या दोन प्रकल्पांची कामे खाजगीकरणांतर्गत "बांधा, वापरा व हस्तांतर करा (बीओटी.)"तत्वावर हाती घेण्याच्या दृष्टीने करावयाच्या करारनाम्याच्या अटी व शर्तीना नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. नियामक मंडळाने मान्य केलेल्या सदर शर्ती व अटी, शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्याबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

३. महामंडळांतर्गत प्रकल्प कामांसाठी निधीचा शासकीय/कर्जरोख्यांद्वारे स्त्रोत्त हा अतिशय मर्यादित झालेला असल्याने खाजगीकरणाद्वारे स्वतःहून एखादी संस्था गुंतवणुकीसाठी पुढे आल्यास त्या संधीचा लाभ घेण्याचे दृष्टीने या प्रकरणी स्वारस्य दाखविलेल्या सदर "वारणा विविध उद्योग व शिक्षण समूह" या संस्थेस खाजगीकरणामार्फत उचित अटी आणि शर्तीसह सदर कामे थेट बी.ओ.टी. तत्वावर स्पर्धात्मक निविदा ऐवजी थेट स्वरुपात हे काम खाजगीकरणासाठी स्वारस्य दाखविलेल्या सदर संस्थेस देण्याबाबत व त्यानुसार शासनास प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.३३/४

"ठराव करण्यात येतो की,

१. चिल्हेवाडी मध्यम प्रकलपाच्या ३० कि.मी. लांबीच्या कालव्याचे काम (वितरण व्यवस्थेसह) हे चालू असलेल्या "क" निविदेअंतर्गतच्या तरतुदीनुसार ठेकेदाराकडून करुन घेण्यात यावे.

२. सदर कालव्याच्या वरील अंगास उत्तरेकडील भागातील क्षेत्र भिजविण्याच्या दृष्टीने, उपसा सिंचनासाठी मागणीनुसार उर्वरीत पाणी उपलब्धतेनुसार, अशा उपसा सिंचन योजनांना पाणी परवाना देण्यात यावा मात्र सदर खाजगी उपसा सिंचन योजनांचा खर्च संबंधित लाभधारकांनीच करावा. अशा उपसा सिंचन योजनांच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी सर्वस्वी लाभधारकांचीच राहील.

३. सदर कालव्याच्या ३० कि.मी. लांबीच्या पुढील भागातील गुळुंचवाडी गावाच्या आसपासच्या क्षेत्रास सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आवश्यक

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे



कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

190

कालव्याची लांबी वाढविण्यासाठी सर्वेक्षण करण्यात यावे व त्यानुसार तयार होणाऱ्या अहवालाची व्यवहार्यता तपासून तो महामंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावा."

ठराव क्र.३३/५

शासनाने महामंडळास आर्थिक वर्ष २००२-२००३ मध्ये वेतन व इतर बाबींसाठी वेळोवेळी आकस्मितता निधीतून अग्रीम उपलब्ध करुन दिला आहे. शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या या अग्रीमाची रक्कम सुमारे २७१ कोटी रुपये इतकी आहे. अग्रीम मंजुरीच्या वेळोवेळीच्या शासनाच्या आदेशातील सूचनेनुसार या अग्रीमाची परतफेड महामंडळामार्फत उभारावयाच्या रोखे मालिकांमधून करावयाची आहे. तथापि महामंडळाकळील विविध बाबींचे मोठ्या प्रमाणावरील प्रलंबित आर्थिक दायित्व विचारात घेता, सन २००२-०३ मध्ये महामंडळामार्फत उभारावयाच्या रोखे मालिकांमधून ही कार्यवाही करणे शक्य नाही. तथापि या कार्यवाहीस वित्त विभाग व नियोजन विभाग यांचे प्रतिनिधी यांनी बैठकीमध्ये असहमती दर्शविली.

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील विविध बाबींचे मोठ्या प्रमाणावरील प्रलंबित आर्थिक दायित्व लक्षात घेता, सदर अग्रीमाची परतफेड ही महामंडळामार्फत वर्ष २००२-२००३ मध्ये उभारण्यात यावयाच्या रोखे मालिकांमधून करता येणे शक्य नाही. याबाबत शासन स्तरावर अवगत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे



कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे